सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर


शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२२/104 दिनांकः- 11 JAN 2022

प्रति,

प्राचार्य /संचालक,

शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांतर्गत संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जावर कार्यवाही करण्याबाबत.......

संदर्भ:- मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई , कार्यासन क्र. १८ यांच्या अध्यक्षतेखाली , दि. १०/०१/२०२१ रोजी विभागीय स्तरावर झालेली व्ही.सी. बैठक .

शैक्षणिक वर्ष **२०२०-२१** मधील महाडिबीटी पोर्टलवरील, तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनांतर्गत संस्थास्तरावरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत आपणांस या कार्यालयामार्फत वारंवार कळविण्यांत आलेले आहे. परंतु महाडिबीटी डॅशबोर्डनुसार यादीतील संस्थांच्या लॉगीन मध्ये अद्याप पर्यत शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. तथापि शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संस्था लॉगीनमधील व विद्यार्थ्यांना Send Back केलेले प्रलंबित अर्ज तात्काळ नामंजूर ( Reject ) करण्याबाबत संदर्भिय बैठकीव्दारे संचालनालयाकडून निर्देश प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने ज्या संस्थांच्या लॉगीन ला विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित आहे त्या संस्थांना पुनःश्च सुचित करण्यात येते की, जर विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष **२०२०-२१** शिष्यवृत्तीचे अर्ज कोणत्याही लॉगीन ला प्रलंबित असेल तर त्या विद्यार्थ्याला चालु वर्षाची (शैक्षणिक वर्ष **२०२१-२२**) करिता अर्ज करण्यात अडचणी येवू शकतात . याबाबत सर्व विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरून सुचना देण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांशी संपर्क करून विद्यार्थ्याच्या लॉगीनला प्रलंबित असलेले अर्ज व संस्था स्तरावरील अर्ज तात्काळ निकाली काढावेत अन्यथा Reject करण्यात यावे. जेणे करून शैक्षणिक वर्ष **२०२१-२२** करिता शिष्यवृत्तीचे अर्ज तपासणी करण्याची लिंक सुरू करणे शक्य होईल.

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे प्रलंबित अर्ज जोपर्यंत महाडिबीटी डॅशबोर्ड पोर्टलवर प्रलंबित दिसेल , तोपर्यंत या विभागामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीकरिता लिंक उपलब्ध करून देण्यात येणार नाही.**

**(टिप :- संस्था व विद्यार्थी स्तरावरील डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनांचे प्रलंबित अर्ज प्रथम प्राधान्याने Reject करण्यात यावे. )**

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रतः- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीकरिता मानार्थ सादर.